रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस - २०२०-२०२१

सन २०२०-२१ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, **Handicap, SC, ST, OBC, SBC, NT all, Paying, EBC, SEBC, EWS** या कॅटेगिरीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी खालील प्रमाणे पूर्तता करुन ठेवावी.

१. **विद्यार्थ्याचे बँकेत खाते नसल्यास पोस्ट ऑफीसमध्येच खाते उघडावे** किंवा शक्य असल्यास बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेतच खाते उघडावे.

२. अगोदर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते असल्यास आधार कार्डच्या वेबसाईडवर आधार कार्ड बँकेला लिंक असल्याची खात्री करुन घ्यावी. बँक खाते **NPCI** पोर्टलला लिंक नसल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. **बँक खाते NPCI ला लिंक नसल्यास लगेच पोस्ट ऑफीसमध्ये खाते उघडून घ्यावे.**

३. रेशनकार्डमध्ये विद्यार्थ्याचे नाव अनिवार्य आहे. रेशनकार्डमध्ये नाव नसल्यास लवकरात लवकर नाव टाकूण घ्यावे.

४. आधार कार्डवरची माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी. उदा. संपूर्ण नाव, पूर्ण जन्मतारीख

५. आधार कार्डला स्वत:चा ईमेल आय.डी. व मोबाईल नंबर लिंक करावा. तसेच सदर मोबाईल नंबर स्वत:च्या बँक खात्यालादेखील लिंक करावा.

६. विद्यार्थ्याकडे स्वत:चे डोमासाईल व नॅशनिलीटी सर्टीफीकेट आवश्यक.

७. विद्यार्थ्याकडे स्वत:चा जातीचा दाखला नसल्यास लवकरात लवकर काढून ठेवावा.

८. व्यावसायिक कोणतेही शिक्षण पूर्ण किंवा अर्धवट घेतल्यांनर ज्युनिअर महाविद्यालय तसेच बी.कॉम,एम.कॉम., बी.बी.ए.सी.ए,, या वर्गासाठी संबंधीत विद्यार्थ्यास शासन आदेशानुसार **शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप मिळणार नाही.** अशा विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय अहमदनगर येथे जाऊन माहिती घेणे. **तसेच १० वी नंतरच्या डिप्लोमा किंवा अन्य व्यावसायिक कोर्स पूर्ण किंवा अर्धवट करुन आलेला असल्यास सदर विद्यार्थ्याचे शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिपचे अर्ज समाज कल्याण कार्यालय अहमदनगर यांचेकडून रद्द केले जातात. ०२४१-२३२९३७८**

९. सर्व विद्यार्थ्यांनी वडीलांचा सन २०१९-२० चा उत्पन्नाचा दाखला तहसील कार्यालयातून काढून घेणे. वडील हयात नसतील तर आईच्या नावाचा उत्पन्नाचा दाखला जोडून वडीलांचा मृत्युचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. तसेच आई-वडील विभक्त राहत असल्यास कोर्टाचे कागदपत्र आवश्यक किंवा कोर्टाचे कागदपत्र नसल्यास १०० रु. बॉण्डवर हमीपत्र द्यावे लागेल.

१०. **OBC, SBC, NT** कॅटेगिरीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न **एक लाख रुपयांपैक्षा** जास्त व **८ लाख रुपयांपैक्षा कमी असेल** अशा विद्यार्थ्यांना फ्रीशिप अर्ज भरण्यासाठी नॉन क्रिमीलियर सर्टीफीकेट अनिवार्य राहील. **या शिवाय सदर फ्रि-शिप अर्ज समाज कल्याण कार्यालयाकडून स्वीकारले जात नाही.**

११. **शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी खालील प्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहे संबंधीत विद्यार्थ्यांनी पूर्तता करुन ठेवावी . अर्जाला उत्पन्नाचा दाखला ओरीजनल लागेल व बाकी कागदपत्रे झेरॉक्स लागतील.**
१. डोमासाईल सर्टिफिकेट (२) रेशन कार्ड - (विद्यार्थ्याचे नाव रेशन कार्डमध्ये आवश्यक ) (३) अल्प कुटुंबाबतचे प्रमाणपत्र (महाडीबीटी वेबसाईटवर दिलेले-साध्या कागदावर देणे फक्त ओ.बी.सी./एस.बी.सी./एन.टी.साठी) (४) या महाविद्यालयातील तसेच बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचा तसेच संबंधीत महाविद्यालयाच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. (५) आधारकार्ड (६) आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असलेला फॉर्म बँकेच्या सही शिक्क्यासह. (७) जातीचा दाखला. (८) प्रवेश पावती. (९) **सन २०१९-२० चा ओरिजनल उत्पन्नाचा तहसिलदार यांचेकडील दाखला जोडावा.** (१०) ओ.बी.सी./ एस.बी.सी./ एन.टी./ मधील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख ते ८ लाखांपर्यंत असेल अशा विद्यार्थ्यांना आपल्या फ्रि-शिप अर्जाबरोबर **नॉन-क्रिमिलियरचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.**(११) दहावी व त्यापुढील पास, नापास, एटीकेटी सह सर्व गुणपत्रक (१२) शैक्षणिक गॅप असल्यास १०० रु. च्या बॉण्डवर गॅप सर्टीफिकेट द्यावे लागेल (१३) बँक पासबुक

१२. BBA ( CA) कोर्सला एस.सी. कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यांना फक्त शिष्यवृत्ती मिळते. फ्री-शिप मिळत नाही.

१३. BBA ( CA) कोर्सला एस.टी. व अपंग कॅटेगिरीतल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्री-शिप मिळते.

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

Schol.Dept./E/C.D. Jain College of Commerce/Shri. Wadankar D.S./Scholarship Notice